नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८ Issue - 8 | वार रविवार दि. २५ मे २०२५ Blow- Sunday Date 25 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आपल्याला टीम इंडियासारखे काम करावे लागणार

## नीति आयोगाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना संबोधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान मोदींनी बैठकीत सहकारी संघराज्यवादावर भर दिला आहे. विकासाची गती आणखी वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्ये एकत्रितपणे काम करतील, असे त्यांनी अधोरेखित केले आहे. ही बैठक या दिशेने एक मोठे पाऊल होते. पंतप्रधान म्हणाले की, आपल्याला टीम इंडियासारखे काम करावे लागणार आहे. नीति आयोगाचे सीईओंनी सांगितले की, बैठकीत सकारात्मक वातावरण होते. राज्यांनी त्यांचे अनुभव, आव्हाने आणि यश सामायिकपणे व्यक्त केले. ज्यामुळे एकमेकांकडून काहीतरी शिकण्याची संधी मिळाली.

राजधानी दिल्लीत आज नीति आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या १० वी बैठक पार पडली. या बैठकीत देशाच्या विकासासाठी एक नवी ब्लू-प्रिंट तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींसह 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न साकार करण्यासाठी काही महत्वाचे पावले विचारले आहेत. नीती आयोगाचे सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी सांगितले की, या बैठकीत विक्रमी ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश सहभागी झाले.

नीती आयोगाच्या या बैठकीत ३६ पैकी ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतला होता. जो आतापर्यंतचा सर्वाधिक सहभाग आहे. पण कर्नाटक, केरळ, पुद्दुचेरी, पश्चिम बंगाल आणि बिहार यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दल आधीच कळवले होते.

बैठकीचा मुख्य अजेंडा 'विकसित भारतासाठी, विकसित राज्ये' असा होता. पंतप्रधान मोदींनी सर्व राज्यांना त्यांचे विकासाचे दृष्टिकोन राष्ट्रीय दृष्टिकोनाशी जोडण्याचे आवाहन केले. गेल्या वर्षीच्या बैठकीपासून ही थीम सुरू आहे आणि आता ती राज्यांसाठी एक रोडमॅप बनली आहे.

राज्यांना त्यांच्या विकासासाठी दीर्घकालीन योजना बनवण्याच्या सूचना पंतप्रधानांनी केल्या आहेत. प्रत्येक राज्य त्यांच्या संसाधनांनुसार, संस्कृतीनुसार आणि गरजांनुसार एक ब्लूप्रिंट तयार करतील, ज्यामुळे 'विकसित भारत २०४७' चे ध्येय साध्य होण्यास मदत होणार आहे. या बैठकीत, नीती आयोगाने त्यांचा कृती अहवाल सादर केला आहे, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या अजेंड्यावर केलेल्या कामाची माहिती होती. हा अहवाल राज्ये आणि केंद्र यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी आधार ठरणार आहे. जरी ५ राज्ये बैठकीला अनुपस्थित राहिली तरी, नीति आयोगाने स्पष्ट केले की, या राज्यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दल (पान ४ वर..)

# ७ कोटी कर्मचाऱ्यांच्या पीएफ खात्यात थेट पैसे येणार

## २०२४-२५ च्या व्याज दराला केंद्र सरकारची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतातील संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून ठराविक रक्कम पीएफ खात्यात जमा केली जाते. ईपीएफओकडून पीएफ खात्यातील जमा असलेल्या रकमेवर दरवर्षी व्याज दिलं जातं. केंद्र सरकारनं आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ईपीएफओकडून शिफारस करण्यात आलेल्या ८.२५ टक्के व्याज दराला मंजुरी दिली आहे. २०२३-२४ मध्ये देखील ८.२५ टक्के व्याज पीएफ खातेदारांना देण्यात आलं होतं. या वर्षी व्याज दरात कपात किंवा वाढ करण्यात आलेली नाही. ईपीएफओने २८ फेब्रुवारी २०२४ ला आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक व्याज दर ८.२५ टक्के ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर हा प्रस्ताव वित्त मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता. वित्त मंत्रालयानं ईपीएफओच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आता लवकरच व्याजाची रक्कम देशातील ७ कोटी पीएफ खातेदारांच्या पीएफ खात्यात जमा केली जाईल.




केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या माहितीनुसार हा निर्णय ईपीएफओच्या २३७ व्या बैठकीत घेण्यात आला होता. या बैठकीचं अध्यक्षपद श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं होतं. हा व्याजदर बाजारातील इतर निश्चित उत्पन्न पर्यायांपेक्षा चांगला मानला जातो. ज्यांना सेवानिवृत्तीनंतर सुरक्षित गुंतवणूक असावी असं वाटतं त्यांच्यासाठी ईपीएफओचा पर्याय चांगला आहे. ईपीएफओने फेब्रुवारी २०२४ मध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी व्याजाचा दर ८.२५ टक्के निश्चित केला होता. तर, २०२२-२३ मध्ये पीएफचा व्याजाचा दर ८.१५ टक्के इतका होता. मात्र, २०२१-२२ मध्ये तो ८.१० टक्के होता. २०२१-२२ चा व्याजदर १९७७-७८ नंतरचा सर्वात कमी व्याज दर होता.

ईपीएफओशी जोडल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या सातत्यानं वाढत आहे. मार्च २०२५ मध्ये १४.६ लाख नवे सदस्य ईपीएफओशी जोडले गेलेले आहेत. ज्यामध्ये अधिक लोक पहिल्यांदा पीएफ योजनेत आले आहेत. ईपीएफओच्या प्रचार प्रसारामुळं दर महिन्याला नव्यानं जोडल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या २.०३ टक्क्यांनी वाढलीय. तर, वार्षिक ०.९८ टक्क्यांनी वाढली आहे. ईपीएफ म्हणजेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधीतील गुंतवणुकीमुळं कर बचत होते. तर, दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार केला असता यातून चांगला परतावा मिळतो. यामध्ये जोखीम देखील नाही. मुदत ठेव आणि बचत योजनांमधील गुंतवणुकीवरील व्याज दर कमी होत असताना ईपीएफओकडून दिलं जाणारं व्याज आकर्षक मानलं जातंय.


# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी २० कोटींचा निधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मृत शेतकऱ्याच्या संबंधित वारसाला वेळीच मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडून २० कोटीचा निधी सर्व विभागीय आयुक्तांना उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले, राज्यामध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेरीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत दिली जाते. महसूल, कृषी, गृह आणि सहकार विभागामार्फत तपासणी करून ही मदत दिली जाते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी, कोकण यांना १२ लाख, पुणे- एक कोटी सहा लाख, नाशिक- तीन कोटी ३९ लाख, छत्रपती संभाजीनगर- चार कोटी ९२ लाख, अमरावती- सहा कोटी ७६ लाख आणि नागपूर विभागीय आयुक्त यांना तीन कोटी ७५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

**मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील**



राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेला हा २० कोटींचा निधी मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता राज्यातील उर्वरीत जिल्हाधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांमार्फत वितरीत करण्यात येणार आहे.

उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यास मान्यता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास तातडीने मदत देण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे निधी अभावी आणि निधी मागणी प्रस्ताव पाठवून त्यास शासनाची मंजुरी घेणे या कारणास्तव मदत देण्यासाठी होणारा विलंब टाळला जाणार असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

# मतदारांसाठी मतदान केंद्राबाहेर मोबाईल ठेवण्याची सुविधा देणार : भारत निवडणूक आयोग

मुंबई : मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे तसेच, प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मोबाईल फोनचा वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील. प्रवेशद्वाराजवळ मोबाईल ठेवण्याची ही सुविधा दिली जाणार असून, मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**निती आयोगाची नवी दिल्लीत बैठक**

**राज्यात २०३० पर्यंत राज्यासाठी ५२ टक्के ऊर्जा हरित स्रोतांतून**

# 'विकसित भारत-२०४७' लक्ष्य साधण्यासाठी महाराष्ट्र 'विकास आणि विरासतचे व्हीजन' घेऊन सज्ज : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विकसित भारत-२०४७ चे लक्ष्य गाठण्यासाठी केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सोबत महाराष्ट्र 'विकास आणि विरासतचे व्हीजन' साकार करण्यासाठी

संपूर्ण क्षमतेने सज्ज असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. तसेच महाराष्ट्रात २०३० पर्यंत राज्यासाठी आवश्यक ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्रोतांतून निर्माण केली जाईल अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. निति आयोगाच्यावतीने आयोजित बैठकीत ते बोलत होते.


मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्राच्या विविध संकल्प, प्रकल्प आणि योजनांना मिळत असलेल्या पाठबळाचा आवर्जून उल्लेख केला. त्यासाठी व केंद्र सरकारच्या विविध विभागांचे सहकार्यासाठी आभार मानले.

सुरवातीलाच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भारतीय सैन्य दल आणि भारताचे पोलादी नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल हृदयपूर्वक आभार मानले तसेच अभिनंदन केले.

बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्राची भविष्यातील वाटचाल स्पष्ट केली.

ते म्हणाले की, राज्यात ४५,५०० मे.वॅ. अतिरिक्त ऊर्जा खरेदीचे करार करण्यात आले आहेत. यातील ३६००० मे. वॅ. ही हरित ऊर्जा आहे. २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्रोतांतून निर्माण होईल. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १० हजार कृषीफिडर्सवर १६,००० मेवॅ. क्षमतेचे प्रकल्प सुरु करण्यात आले असून, त्यातील १४०० मेवॅ.चे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना शंभर टक्के वीज दिवसा उपलब्ध होईल आणि ती सौर प्रकल्पांतून असेल. राज्यात १०० गावांत सौरग्राम योजना सुरु असून, १५ गाव संपूर्णत: सौर ऊर्जाग्राम झालेले आहे. पंप स्टोरेजसाठी नवीन धोरण आखण्यात आले असून, ज्यात ४५ पीएसपीसाठी विविध विकासकांसोबत १५ करार करण्यात आले आहेत. याची एकूण क्षमता ६२,१२५ मेवॅ इतकी असून, ३.४२ लाख कोटींची गुंतवणूक यातून होईल. ९६,१९० इतके रोजगार सुद्धा निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र २०४७ असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, १०० दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्त्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी ७०० हून अधिक उद्दिष्ट साध्य केले. आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात २०४७ साठी दीर्घकालिन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे २०३५ साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह २०२९ साठीचे अल्पकालिक ५ वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे. विद्यमान अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची करण्याचा मुख्य उद्देशअसल्याचेही त्यांनी सांगितले.



महाराष्ट्राचे भारताचे गुंतवणूक मॅग्नेट असल्याचे स्पष्ट करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, २०२४-२५ या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक १.३९ लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५.९६ लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील ५० टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शनात एमएमआर क्षेत्राला ग्रोथहब म्हणून आम्ही विकसित करीत असून, ज्यातून २०४७ पर्यंत या क्षेत्राला १.५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करणे हा उद्देश साध्य करायचा आहे. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष वित्तीय मदत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी टीयर-२ आणि टीयर-३ शहरांमध्ये औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांतून आता गडचिरोली ही स्टील सिटी, नागपूर हे संरक्षण हब, अमरावतीत टेक्सटाईल क्लस्टर, छत्रपती संभाजीनगर हे ईव्ही उत्पादन, ऑरिक सिटी तर रायगड जिल्ह्यातील दिघी येथे स्मार्ट इंडस्ट्रीयल सिटीचे निर्माण होत आहे, अशी माहितीही दिली.

एमएसएमई' क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राचे ६० लाखांहून अधिक एमएसएमई उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत आहे. हे देशात सर्वाधिक आहे. यासाठी ईज ऑफ डुईंग बिझनेस, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम इत्यादीतून २ लाख उद्यमींना संधी प्राप्त झाल्या आहेत. अलीकडेच मुंबईत वेव्हज परिषदेच्या माध्यमातून दोन वैश्विक स्टुडियोंसाठी ५००० कोटींचे सामंजस्य करार झाले, मुंबईत आयआयसीटीची स्थापना, एनएसईत वेव्हज इंडेक्सचा शुभारंभ तसेच युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याशी करार झाल्याचेही त्यांनी सांगितले.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मध्ये असून, त्यासाठी केंद्राचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदत महाराष्ट्राला मिळेलच, असा विश्वास देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या बैठकीत व्यक्त केला.

# पशुसंवर्धन व्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यासाठी सकारात्मक : उपमुख्यमंत्री अजित पवार

## समुपदेशनाद्वारे बदल्यांमुळे अधिकाऱ्यांमध्ये समाधान : पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील पशुपालकांना कृषी क्षेत्राप्रमाणे पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी दर्जा देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

पशुसंवर्धन विभाग अंतर्गत सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. औंध येथे जैव सुरक्षा स्तर-२ (बीएसएल-२) व स्तर- ३ (बीएसएल- ३) प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भीय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा आणि सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, आमदार उमा खापरे, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे आदी उपस्थित होते.

आज उद्घाटन झालेल्या प्रयोगशाळा, रुग्णालय आदी सुविधा या राज्यातल्या शेतकऱ्यांच्या पशुधनाला उत्तम आरोग्यासाठी तसेच पशुधनापासून मिळणारे उत्पादन आणि उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास व्यक्त करून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, या सुविधांच्या निर्मितीसाठी ८६ कोटी रुपये राज्यशासनाने खर्च केले आहे. देशातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा अधिक व्यवस्थित सुविधा महाराष्ट्राने या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत. पशुसंवर्धन विभागाला योजनांसाठी निधीची कोणतीही कमतरता पडू दिली जाणार नाही, असेही ते म्हणाले.

**जैव सुरक्षा प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भीय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा, सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाचे उद्घाटन**

राज्यातील शेतकरी, पशुपालकांना पशुधनापासून व पशुपालनापासून येणारे उत्पन्न दुप्पट करावे. पशुसंवर्धनाशी निगडीत अनेक बाबतीत आपण देशात पुढे असले तरी अंडी उत्पादन व कुक्कुटपालनात सहाव्या-सातव्या क्रमांकावर आहे. त्यामुळे या क्षेत्रात आघाडीवर येण्यासाठी पशुपालकांना विविध सोयी, सवलती देणे आवश्यक आहे. आपल्याला पशुपालकांचे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढ करायचे असून त्यांना आर्थिक बाबतीत सक्षम करायचे आहे.

प्रयोगशाळेत होणारे संशोधन आणि तेथे निर्मिती होणारी लस महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. अलिकडच्या काळात प्राण्यांपासून माणसांना अनेक आजार होतात, त्यामुळे याबाबतीतही अधिक संशोधन आणि लस निर्मिती होण्याची गरज आहे.

माणूस आणि प्राण्यांचे नाते ऐतिहासिक काळापासूनचे आहे. शेती आणि पशुपालनाच्या माध्यमातून माणसाने आपले भरणपोषण करण्याचा प्रयत्न केला आहे. हाच प्रयत्न आपल्याला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायचा असून त्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाला चालना दिली जात आहे.

पशुसवंर्धन विभागात सर्वात पारदर्शक बदल्या झाल्याबद्दल आणि विभागाच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच जीएमपी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दलही पशुसंवर्धनमंत्री विभागाचे त्यांनी अभिनंदन केले. आरोग्याच्या दृष्टीने सर्वच बाबतीत स्वच्छतेला महत्त्व असून त्याचे पालन होणे गरजेचे आहे. प्लास्टिकबंदीसाठी आग्रही राहू असेही श्री. पवार यावेळी म्हणाले.

**समुपदेशनाद्वारे बदल्यांमुळे अधिकाऱ्यांमध्ये समाधान-मंत्री पंकजा मुंडे**

पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, विभागाचे काम करत असताना अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळेल असे काम करण्याचा प्रयत्न आहे. अनेक पशुवैद्यकीय अधिकारी आदिवासी विभागात, अवघड क्षेत्रात काम करत होते. विभागाने समुपदेशनाने बदल्यांचा निर्णय घेतल्याने जवळपाच ५६० बदल्या केल्या त्यापैकी ९९ टक्के अधिकाऱ्यांना त्यांच्या इच्छेच्या ठिकाणी बदल्या मिळाल्या. या अधिकारी- कर्मचाऱ्यांनी पशुपालकांच्या कल्याणासाठी काम करावे, असेही ते म्हणाले.

पशुसंवर्धनाच्या योजनांचे लाभ कृषीप्रमाणे पशुपालकांना मिळावेत यासाठी पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा मिळावा. गाई- पशु हे उघड्यावरील प्लास्टिक खात असल्याने त्याचे अंश दुधात येऊन बालकांना अनेक आजार जडत आहेत. त्यामुळे प्लास्टिक बंदीबाबत विचार व्हावा, असेही त्या म्हणाल्या. दूध भेसळीला अटकाव करण्यासाठीचा कायदा कडक करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात सर्वच निकषात उत्कृष्ट काम करून विभाग पहिल्या क्रमांकावर आल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. सचिव डॉ. रामास्वामी एन. म्हणाले, आज स्थापन झालेल्या राष्ट्रीय संदर्भीय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळेचा लाभ महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दीव व दमन आदी देशाच्या पश्चिम क्षेत्राला होणार आहे. बीएसल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळा आणि सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयामुळे पशुपालकांना लाभ होणार आहे. येथील प्रयोगशाळेला जीएमपी प्रमाणिकरण प्राप्त झाल्यामुळे तयार होणाऱ्या लसीला देशात मान्यता व मागणी वाढेल. रुग्णालयात अजून अत्याधुनिक यंत्रसामुग्री घ्यायची असून त्यासाठी अधिक निधी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी या विविध प्रयोगशाळा आणि रुग्णालयांचे उद्घाटनानंतर मान्यवरांनी त्यांची पाहणी करुन माहिती घेतली. कार्यक्रमादरम्यान विभागाला मिळालेल्या जीएमपी प्रमाणीकरण प्रमाणपत्राचे अनावरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# निवडणूक आयोगाकडून वकील व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नवी दिल्ली येथील खखखऊएच् मध्ये भारताच्या निवडणूक आयोगाच्या वतीने आयोजित वकिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी हे देखील उपस्थित होते. या परिषदेत भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील आणि देशभरातील २८ उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ तसेच सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी (CEOs) आणि निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.

या उपक्रमाचा उद्देश आयोगाच्या कायदेशीर चौकटीला उदयोन्मुख आव्हानांचा सामना करण्यासाठी अधिक प्रभावीपणे पुन्हा आकार देणे आणि समन्वय साधणे हा आहे. परिषदेच्या माध्यमातून अनावश्यक वाद टाळण्यावर आणि सर्व संबंधित पक्षांना योग्य त्या सुनावणीची संधी देण्यावर भर देण्यात आला.

दिवसभर चाललेल्या या परिषदेने देशभरातील प्रख्यात कायदा तज्ज्ञ आणि आयोगातील प्रतिनिधी यांच्यात संवाद साधण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ही परिषद भारतातील निवडणूक संबंधित न्यायप्रणालीच्या बदलत्या स्वरूपाशी आयोगाच्या कायदेशीर संसाधनांना जुळवून घेण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली. यामध्ये निवडणूक कायदे, न्यायालयीन प्रक्रिया आणि कायद्यातील सुधारणांशी संबंधित मुद्द्यांवर विशेष भर देऊन आयोगाच्या कायदेशीर संघटनेची कार्यक्षमता, तयारी आणि समन्वय वाढवण्यावर चर्चा झाली. या संवादाद्वारे विविध न्यायालयीन स्तरांवरील आयोगाच्या प्रतिनिधित्वाची प्रभावीता वाढवण्याचा उद्देश होता.

शुक्रवारी, IIIDEM नवी दिल्ली येथे आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची स्वतंत्र परिषद आयोजित केली. या परिषदेचा उद्देश आयोगाच्या खढ उपक्रमांची दिशा निश्चित करणे आणि भविष्यातील योजनांची आखणी करणे हा होता. एउख ने २०२५ मध्ये एक अभिनव उपक्रम सुरू केला असून, ECINET नावाचे एकात्मिक डॅशबोर्ड विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. या डॅशबोर्डच्या माध्यमातून आयोगाच्या सर्व माहिती-संबंधित उपक्रमांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. संबंधित कायदेशीर अटींच्या मर्यादेत राहून सर्व भागधारकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होईल असा हा उपक्रम असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

# कोल्हापुरात ‘वळीव’च्या पावसाची बॅटिंग; पंचगंगेच्या पाणी पातळीत वाढ, राजाराम बंधारा पाण्याखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : जिल्ह्यात मान्सूनच्या आधीच वळीव पावसाने गेल्या चार-पाच दिवसांपासून जोरदार बॅटिंग केली आहे. परिणामी पंचगंगेच्या पाणी पातळीत देखील वाढ झाली असून कसबा बावड्यातील राजाराम बंधारा दुपारी अडीचच्या सुमारास पाण्याखाली गेला आहे. यामुळे खबरदारी म्हणून बंधाऱ्यावरुन होणारी वाहतूक दोन्ही बाजूला बॅरिकेटिंग टाकून बंद करण्यात आली आहे. पावसामुळे गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे सुर्याचे दर्शन झालेले नाही. अशातच आणखी तीन ते चार दिवस पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. परिणामा नागरिकांना मे च्या उन्हाळ्यात देखील पाऊस असल्याने छत्री रेनकोट घेऊनच घराबाहेर पडावे लागत आहे.

गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यात सुरू असलेल्या वळीव पावसामुळे पंचगंगेच्या पाणी पातळीत चांगलीच वाढ झाली आहे. ठिकठिकाणी सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. ऑफिस महाविद्यालयाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना छत्री व रेनकोट सोबत घेऊन घराबाहेर पडावं लागत आहे. पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत गेल्या २४ तासात तब्बल दीड फुट वाढ झाली आहे. काल सायंकाळी १५ फूट तीन इंच असलेली पाणीपातळी आज सायंकाळी पाचच्या सुमारास १६ फूट नऊ इंचवर पोहचली होती. कसबा बावडा येथील राजाराम बंधारा देखील पाण्याखाली गेल्याने वडणगे गावात या पुलावरून वाहतूक करणाऱ्यांसाठी हा मार्ग दोन्ही बाजूला बॅरिकेटिंग टाकून बंद करण्यात आला आहे.

दरवर्षी एक जून रोजी बंधाऱ्याच्य लोखंडी दारं काढून बंधारे उघडण्यात येतात. मात्र यंदा अचानक पडलेल्या पावसामुळे पाटबंधारे विभागाला लोखंडी दारं काढता आलेली नाहीत. यामुळे शिंगणापूर सह नदी काठी असलेल्या शेतात काही प्रमाणात पाणी शिरलं असून शेतकऱ्यांचा नुकसान होत आहे. आता पावसाच्या उघडीपीनंतर ही दारं काढण्याचे काम पाटबंधारे विभाग हाती घेणार असून एकदा काढलेल्या प्लेटा चार महिन्यानंतर म्हणजेच पावसाळा संपल्यानंतरच बसवल्या जातात. तर पुढील तीन ते चार दिवस असाच वळीव पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

दरम्यान गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साचू लागले आहे. अनेक ड्रेनेज लाईनमध्ये कचरा अडकल्याने पाणी रस्त्यावरून वाहत आहे. तर काही ठिकाणी पाण्याचा निचरा होत नाही. गेल्या महिन्याभरात नालेसफाई मोहिमेत महानगरपालिकेकडून तब्बल १८ हजार मेट्रिक टन गाळ काढण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. एवढा काढलेला गाळ कोठे टाकला, हा प्रश्नचिन्ह आहे. वळीवाच्या पावसातच शहरात गुडघाभर पाणी साचल्याने महानगरपालिकेच्या नालेसफाई व एकूणच काम काजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. दरम्यान यंदा अधिक पाऊस असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडणे किंवा महापुराचा सामना करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाची टीम सज्ज होऊ लागली असून लवकरच नियंत्रण कक्ष देखील सुरू होणार आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या पोलीस दलाच्या तीन इमारतींचे उद्घाटन व निवासस्थान इमारतींच्या कामाचे भूमिपूजन

# लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस भरतीला प्राधान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : राज्यात आदर्श पोलीस प्रशासन निर्माण करण्यासाठी लोकसंख्येच्या अनुरुप पोलीसांची संख्या ठेवली जाणार आहे. त्यामुळे गृह विभागामार्फत नव्याने ४० हजार पोलीसांची भरती केली आहे. यापुढेही राज्यात पोलीस भरतीला प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सांगली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्घाटन व निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी राज्याचे उच्च शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री अरुण लाड, जयंत पाटील, डॉ. सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, डॉ. विश्वजीत कदम, गोपीचंद पडळकर, सत्यजीत देशमुख, सुहास बाबर, अमल महाडिक,मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्र) डॉ. शशिकांत माहवरकर, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पोलीस गृहनिर्माण महामंडळातर्फे राज्यातील पोलीस कार्यालय व पोलीसांच्या निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे.सध्या ९४ हजार निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येत असून सायबर गुन्ह्यांच्या उकलीमध्ये देशात महाराष्ट्र पोलीस अव्वल असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. अंमली पदार्थाच्या तस्करीत, व्यवसायात, पोलीसांचा सहभाग आढळल्यास संबंधीत पोलीसाला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्याचा इशारा देत अंमली पदार्थांच्या बाबतीत झिरो टॉलरन्स असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात गुन्हेगार मोकाट सुटणार नाही हा विश्वास राज्यातील सामान्य माणसाला वाटेल अशा रितीने पोलीस विभाग कार्यरत राहील मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने राज्यातील निवासस्थाने अतिशय गुणवत्तापूर्वक उभी केली असल्याबद्दल त्यांनी पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी यांचे विशेष अभिनंदन केले.




पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्याचे पोलीस दल अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटीबध्द असून त्याला योग्य तो निधी दिला जाईल, तसेच जिल्ह्यात ड्रग्ज विरोधी मोहिम प्रभावीपणाने राबविली जाईल. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त सुमारे २ कोटी १३ लाख इतक्या रुपयांच्या १६ वाहनांचे लोकार्पण त्याचबरोबर सायबर विभाग अधिक गतिशील व्हावा या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त झालेले सुमारे १५० संगणक, १५० स्कॅनर तर ४० मल्टी फंक्शन प्रिंटरचे सायबर विभागाला हस्तांतरण केले.

तत्पूर्वी श्री. फडणवीस यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत त्याचबरोबर कडेगाव व आटपाडी पोलीस ठाण्याच्या इमारतींचे उद्घाटन तर सांगली येथे पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या २२४ सदनिकांचे रिमोटद्वारे भुमिपूजन केले.

जिल्ह्यात ६ उपविभाग कार्यरत असून सांगली व मिरज या दोन विभागाकरिता सदनिका मंजूर झाल्या आहेत. नवीन पोलीस मुख्यालय इमारतीमध्ये आधुनिक सुविधांनी युक्त कार्यालये, प्रशिक्षण हॉल्स, अधीक्षक कार्यालय, गुन्हे अन्वेषण विभाग, आणि कर्मचारी वसतिगृहे यांचा समावेश आहे. या नव्या सुविधांमुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कार्यात अधिक कार्यक्षमता येईल असा विश्वास व्यक्त करुन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याला जिल्हा पोलीस दलाचे प्राधान्य असल्याचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले.

सांगली शहरामध्ये उभारण्यात आलेल्या या पोलीस अधीक्षक कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये जिल्हा पोलीस प्रमुखांचे कार्यालय, विविध शाखांचे स्वतंत्र विभाग, सुसज्ज कॉन्फरन्स हॉल, तांत्रिक सुविधांनी सज्ज विभाग, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा, महिलांसाठी स्वतंत्र कक्ष आदींचा समावेश आहे.

ही इमारत पूर्णतः सीसीटीव्ही प्रणाली अंतर्गत सुरक्षित असून शाश्वत ऊर्जा वापराच्या दृष्टीने सौरऊर्जा सुविधांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा, प्रशस्त पार्किंग व स्वच्छतागृहे, ऊर्जा कार्यक्षम रचना व हरित इमारत, रेन वॉटर हर्वेस्टींग या संकल्पना राबविण्यात आली आहे.

या इमारतीत चार मजले असून ५२४४ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ आहे. सुमारे १४ कोटी ३४ लाख रुपये खर्च झाला. या उद्घाटन सोहळ्याला पोलीस अधिकारी, कर्मचारी, आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# योग आणि खेळांना जीवनात स्थान द्या : अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह

## ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर अपर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते दोन दिवसीय योग शिबीराचे उद्घाटन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : तपश्चर्या आणि आत्मसंयमाने शरीर निरोगी आणि मन शांत होते. आणि यासाठी एक प्रमुख माध्यम म्हणजे योग आणि खेळ. घर असो वा कार्यालय, शाळा असो वा उद्यान, आपल्याला व्यायाम हा जीवनाचा एक भाग बनव-ावा लागेल, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी आज येथे केले.

२१ जून रोजी होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि जिल्हा क्रीडा कार्यालय यांचे सयुंक्त विद्यमाने शासकीय मैदान, नेहरू नगर, सोल-ापूर येथे सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत आयोजित दोन दिवसीय योग अभ्यास शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्रीमती सिंह बोलत होत्या.






यावेळी सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, नीर सोशल फौंडेशनचे अध्यक्ष हेमंत जाधव, न्यू जॉगर्स फौंडेशनचे अध्यक्ष संतोष आरवत्तु, उद्योजक वीरेश नसले, निवृत्त अधिकारी सतीश घोडके, ज्येष्ठ पत्रकार अजितकुमार संगवे, योग सेवा मंडळाचे अध्यक्ष सुनील आळंद, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापुरे, स्वामी समर्थ अकेडमीचे रवी राठोड, विराट स्पोर्ट्सचे सूर्याजी लिंगाडे, सिद्धेश्वर करिअर अकेडमीचे अतुल शिंदे आणि माजी अध्यक्ष संतोष कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती सिंह म्हणाल्या योगसाधनेच्या निरंतर अभ्यासामुळे शरीर, मन आणि आत्मा यांची सांगड घातली जाते. ते एकमेकांना जोडले जावून त्यांच्यातील समतोल राखण्यास मदत होते. नियमित योग केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते.

सदरील योग दिनानिमित केंद्रिय संचार ब्यूरोच्या उइउडे-श्ररीीी या फेसबुक, एक्स आणि इंस्टाग्राम हँडलवरून दररोज एक योग आसनांची चित्र व मजकुरासहित माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे योग सराव करण्यास मदत होण-ार आहे. तसेच शिबिराच्या विविध ठिकाणी योगासनांची माहिती मोबाईल वर मिळवण्यासाठी क्यू आर कोड लावण्यात आले आहे तसेच सदर योग शिबीर दोन दिवसीय असून उद्या दिनांक २४ मे रोजी देखील युवकांनी मोठ्या उत्साहाने योग शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अंबादास यादव यांनी प्रस्ताविकेतून केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबादास यादव यांनी केले. आभार नरेंद्र पवार यांनी मानले. सूत्रसंचालन अश्विनी कोंडाबत्तीन हिने केले. शिबिराची सुरुवात दीपप्रज्वलना-ने करण्यात आले. जितेंद्र महामुनी यांनी शंखध्वनीने योग शिबिराची सुरुवात केली. आयुष्य मंत्रालयाने नेमून दिलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे योग सेवा मंडळाचे योग गुरु मनमोहन भुतडा यांनी योगासनांची माहिती दिली आणि लता माळगे, वासुंती निंबाळकर, कालिदास कोंडा यांनी शिथिली करण्याचे व्यायाम, उभी व बैठे योगासने, पोटावरील व पाठीवरील योगासने, प्राणायाम आणि ध्यान धारणाची प्रात्यक्षिके आणि सराव करून घेतले. उद्या दिनांक २४ मे रोजी सकाळी ६ ते ८ यावेळेत विवेकानंद केंद्राचे रवी कंटली आणि त्यांचे सहकारी योग अभ्यास घेणार आहेत.

यावेळी केंद्रीय संचार ब्यूरोचे कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, साईराज राउळ, मनोज जखेटिया, काशिनाथ औरसंग, गुरुलिंग प्रचंडे, पंकज वाघमोडे, रफिक शेख, योगीराज कोंडाबत्तीन, योग सेवा मंडळाचे विद्या होनमोडे, संतोष सासवडे, दत्तगुरू वेदपाठक, सुजाता बिडकर, सुभाष जोशी आणि समर्थ करिअर अकेडमी, प्रार्थना अकेडमी, सिद्धेश्वर अकेडमी आणि विराट स्पोर्टस अकेडमीचे शिक्षक, खेळाडू, वरिष्ठ नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात...

### फ्लॅट विक्री करून फसवणूक; एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : फ्लॅट विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० डिसेंबर २०२२ रोजी ते आजतागायत पर्यंत घडली. याप्रकरणी महेश पंचप्पा कापसे (वय-५४,रा.बुधवार पेठ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.




त्यांच्या फिर्यादीवरून अमित थोबडे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गॅलोर डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत लाइफस्टाईल होम्स विजापूर रोड सोलापूरचे संचालक वरील संशयित आरोपी यांनी पनाश लाइफस्टाईल होम सोलापूर विजापूर रोड येथील बिल्डिंगमध्ये फ्लॅट नंबर १२०१ हे फ्लॅट दस्त नंबर ४३५५ / २०२२ दि.२९ ऑगस्ट २०२२ अन्वये हार्दिक शहा यांना विक्री केले असताना फिर्यादी कडून ३२ लाख ५ हजार रुपये रक्कम आरटीजीएसने घेऊन फ्लॅट फिर्यादीस विक्री करून फिर्यादीची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# पोलीस विभागासाठी विशेष मार्गदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर पोलीस स्टेशन नेमणुकीतील अधिकारी व अंमलदार यांचे करिता जीवन विद्या मिशन, मुंबई यांच्या तर्फे व्यसन, आरोग्य, मन याबाबत जागृती निर्माण करून नोकरी तणावाचे व्यवस्थापन कसे करावे, कर्तव्य बजावत असताना मनाचे सबलीकरण व सकारात्मक दृष्टिकोण राहावा यासाठी जीवनविद्या प्रणित मानसिक ताणतणाव कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सपोआ/ उ,नगर/२५६१/२०२५दि. ३०/०४/२०२५ अन्वये अधिकारी अंमलदार यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रम प्रमुख उपस्थीत श्री सतनारायण. उल्हासनगर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णू ताम्हाणे सर श्री. चंद्रहार गोडसे पोलीस निरीक्षक ( गुन्हे )उल्ह-ासनगर पोलीस स्टेशन.

सदर कार्यशाळेस १२ अधिकारी ५४ अंमलदार यांनी उपस्थित राहून सदर मानसिक ताणतनामुक्ती कार्यशाळेचा लाभ घेतला.

# आपल्याला टीम इंडियासारखे काम करावे लागणार

(पान १ वरून..) आधीच माहिती दिली होती. या राज्यांशी स्वतंत्र संवाद केला जाणार आहे. आर्थिक विकास, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती या महत्वाच्या विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी राज्यांना नवीन सूचना देण्यात आल्या. पंतप्रधान मोदींनी तंत्रज्ञान आणि नवोपक्रम हे विकासाचे इंजिन असल्याचे अधोरेखित केले आहे. डिजिटल पायाभूत सुविधा आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांना ठोस पावले उचलण्यास सांगण्यात आले.

'एक भारत, सर्वोत्तम भारत' ची भावना

या बैठकीत 'एक भारत, सर्वोत्तम भारत'ची भावना बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. पंतप्रधानांनी म्हटले की, २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचा मार्ग म्हणजे सर्व राज्यांनी एकत्र काम करणे.

# विज्ञान सोपे करुन सांगण्यात जयंत नारळीकर यांचे मोठे योगदान : मंत्री ॲड.आशिष शेलार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विज्ञान सोपे करुन सांगण्यात पद्मभूषण प्रा.जयंत नारळीकर यांचे मोठे योगदान हो-ते. मुलांना विज्ञानाची गोडी खऱ्याअर्थाने जयंत नारळीकर यांनी लावली, असे गौरवोद्गार सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी काढले.



भारतीय विज्ञ-ानजगताचे अध्वर्यू, पद्मभूषण प्रा.जयंत नारळीकर यांना महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत दि. २३ मे रोजी आयोगाच्या कार्यालयात शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

या सभेला राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, आयोगाचे अध्यक्ष डॉ.अनिल काकोडकर, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे सल्लागार डॉ.अ.वि सप्रे, नेहरू तारांगणचे संचालक अरविंद परांजपे,ऋ प्राचार्य अनिरुद्ध पंडित यांच्यासह आयोगाचे सदस्य व विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ प्राध्यापक यावेळी उपस्थित होते. खगोलशास्त्र आणि सैद्धांतिक भौतिकशास्त्र या क्षेत्रात प्रा.नारळीकर यांनी भारताला जागतिक स्तरावर विशेष ओळख मिळवून दिली. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे विज्ञानाचा सर्वसामान्यांपर्यंत प्रसार केला. त्यांनी विज्ञ-ानाला केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित न ठेवता, पुस्तकांच्या माध्यमातून आपल्या सहज सोप्या शैलीतून नव्या पिढीशी जोडण्याचे कार्य केले. पद्मभूषण प्रा.जयंत नारळीकर यांचे कार्य नेहमीच आम्हाला प्रेरणा देत राहील, अशा शब्दांत मंत्री ड.शेलार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



## भाविकांनी ऑनलाईन दर्शनपास बुकींग सुविधेचा लाभ घेण्याचे मंदिर समितीचे आवाहन

# श्री विठ्ठल रुक्मिणी ऑनलाइन दर्शन पास बुकींगच्या संख्येत व वेळेत केली वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर दि.२४ :- श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना ऑनलाईन पध्दतीने सोयी सुविधा उप-लब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समिती मार्फत संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. या संकेतस्थळावरून निशुल्क दर्शन पास बुकिंगची सुविधा भाविक भक्तांसाठी उपलब्ध असून, जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणीचे सुखकर पददर्शन घेता यावे यासाठी ऑनलाइन दर्शन पास बुकींग संख्येत व वेळेत वाढ करण्यात आली असून या सुविधेचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले आहे.



श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर च्या अधिकृत संकेतस्थळावरून दर्शन पास बुकिंगची सुविधा भाविक भक्तांसाठी उपलब्ध आहे. या सुविधेचा वापर करून, भक्तांना त्यांच्या इच्छित दिवशी आणि वेळेस मंदिरात पदस्पर्शदर्शन घेता येते, ज्यामुळे रांगेत जास्त वेळ उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही. सण, यात्रा, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून स.७.०० ते रा.९.०० या वेळेत एकूण ६ स्लॉट निश्चित करून, प्रति स्लॉट ६०० प्रमाणे दैनंदिन ३६०० पासेस उपलब्ध असणार आहेत. याशिवाय, जास्तीत जास्त १० दिवस अगोदर बुकींग करता येणार असून, पासेस शिल्लक राहिल्यास त्याच दिवशी तात्काळ बुकींग करता येईल.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत https://www.vitthalrukmini-mandir.org या संकेतस्थळाला भेट देऊन, मुख्य पृष्ठावर झर्री इेज्ञळपस या लिंकवर क्लिक करा, बुकिंग फॉर्म भरा, बुकिंग तारीख निवडा, माहिती भरा, फोटो अपलोड करा, बुकिंग पूर्ण करा, पास डाउनलोड व प्रिंट करा, बुकींग तारखेच्या दिवशी मंदिर परिसरातील श्री संत तुकाराम भवन येथे १५ मिनिटे अगोदर भेट द्या व आपले आ-ळखपत्र (उदा. आधार कार्ड) दाखवा आणि पासची तपासणी करून, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे दर्शनासाठी प्रवेश करावा. सदरची सुविधा निश-ुल्क असून, यासाठी कोणत्याही प्रकारची मंदिर समिती फी आकारणार नाही. तसेच पंढरपूर शहर व परिसरातील महा-ई सेवा केंद्र येथे व मंदिर समिती मार्फत देखील लवकरच बुकींग केंद्र स्थापन करून भाविकांना बुकींगची सोय उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न आहे.

तसेच सदर संकेतस्थळावर मंदिराची माहिती, देणगी, पुजा बुकींग, भक्तनिवास बुकींग व दर्शनपास बुकींगची सोय देखील उपलब्ध आहे. या ऑनलाईन सुविधांचा भाविकांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या व मंदिर समितीच्या ०२१८६ २२४४६६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले आहे.

# डिकसळ- कोंढार चिंचोली नवीन पुलाच्या कामाची मा.आ. संजय मामा शिंदे यांनी केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील तीन जिल्ह्यांच्या सीमेवर असणारा ब्रिटिश कालीन डिकसाळचा पूल कचरा आणि जड वाहतूक बंद झाली होती. सदर पुलाची किरकोळ दुरुस्ती करून हलक्या वाहनाची वाह-तूक सदर पुलावरून सुरू होति.

परंतु करमाळा तालुक्यासह पुणे, नगर, सोलापूर, या तीन जिल्ह्याला जोडणाऱ्या डिकसळ फुलाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी तत्कालीन अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्या सहकार्यातून ५५ कोटी रुपये ही मंजुरी महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये मिळवली होती व त्यानंतर किती सरकारने त्यावरती स्थगित आणली ती स्थगिती उठवल्यानंतर २०२३ मध्ये सदर कामाची प्रशासकीय मान्यता मिळवून २०२४ मध्ये प्रत्यक्ष कामात सुरुवात झाली.

कामाची मंजुरी त्यावरती दिली गेलेली स्थगिती, स्थगिती उठवणे, प्रशासकीय मान्यता निधीची तरतूद नैसर्गिक अडथळे धरण भरणे आणि कारणामुळे ३६ महिन्यांपैकी २० महिन्याची मुदत संपलेली आहे. काम समाधानकारक नाही, परंतु सध्या आपण सरकारमध्ये नसलो तरी संबंधित कामाच्या बाबतीत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध असून अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून या कामाला कुठलीही अडचणी येऊन देणार नाही असे आश्वासन डिकसळ पूलपाहणी प्रसंगी माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी दिले.

यावेळी बारामती ग्रो कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुभाष आबा गुळवे व संबंधित ठेकेदारांची मॅनेजर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.